भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये | Rs. 100

रु. 100 | ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2024 प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त 12AB 819361

| | |
|---|---|
| दस्ताचा प्रकार : | अनुच्छेद क्रमांक |
| दस्त नोंदणी करणार आहात का? : | दु.नि.कार्यालयाचे नांव : |
| मिळकतीचे वर्णन : | |
| मोबदला रक्कम : | |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता : | दत्ताजीराव कदम आर्टस,सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर |
| हस्ते असल्यास त्याचे नांव व पत्ता : | रोहित प्रकाश शिंगे रा. इचलकरंजी |
| दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता : | शि.वि.म.संघ कोल्हापूर |
| मुद्रांक शुल्क एकूण रूपये : | 100 पैकी रू. |
| मुदांक विक्री नोंद वही अनुक्रमांक : | 4059 दिनांक : 23/07/2024 |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही | मुद्रांक विक्रेत्याची सही |

मुद्रांक विक्रेत्याचे नांव : श्री श्रीकांत तुकाराम सातपुते, पत्ता - अग्नीशमनदल (फायर ब्रिगेड) रोड, लगारे बिल्डींग, इचलकरंजी
मुद्रांक विक्री परवाना क्रमांक : ८/९३ लायसन्स कोड नं. २६०७००९

ज्या कारणासाठी ज्यांन मुदांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

Sub Treasury Office Ichalkaranji
16 JUL 2024
Sub Treasury Officer Ichalkaranji

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

# दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

तालुका हातकणंगले , जिल्हा कोल्हापूर ४१६११५

## मराठी विभाग

आणि

## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अक्षर, प्लॉट नंबर ८/९ युनीट डी, सत्याई नगर, फुलेवाडी रिंग रोड, कोल्हापूर- ४१६०१०

Scanned with OKEN Scanner

या संस्थातील

# सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

१४ जुलै २०२४

**शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर**

**आणि**

**दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी**

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे. मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी प्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित, ललितेतर ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No.2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश केलेला आहे.

वरील नमूद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आणि दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि. १४ जुलै २०२४ रोजी करत आहेत. या कराराची उद्दिष्टये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.



Scanned with OKEN Scanner

**उद्दीष्टये**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

४. निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक / दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्यिक विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयांच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०.ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणा-या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना यासंदर्भात सूचना-पत्रव्यवहार करणे.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करुन विचारविनीमय करणे.



Scanned with OKEN Scanner

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

**अटी**

१. आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

२. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

३. कोणत्याही महाविद्यालयांस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४. सदर परस्पर सामंजस्याचा कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल.

५. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

**समन्वय**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून प्राचार्य, विभाग प्रमुख काम करतील.

२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. खालील स्वाक्ष-यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिका-यांत होत आहे तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रो.(डॉ.) सुभाष जाधव | डॉ. एस.एम. मणेर | प्रो.(डॉ.) मंतेश हिरेमठ | डॉ. भरत जाधव |
| प्रमुख,मराठी विभाग | प्राचार्य | सचिव | अध्यक्ष |

दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर.

प्रमुख मराठी विभाग डी.के.ए.एस.सी.कॉलेज इचलकरंजी

प्राचार्य, डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी.

सचिव व खजानीस शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर



Scanned with OKEN Scanner